**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६ (The Rights of Persons with Disability Act,२०१६) नुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग-२०२६/प्र.क्र.६४/रूशआ-२ ई.क्र. १५७५६७६**
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला,
मंत्रालय, एल.टी. मार्ग, मुंबई
दिनांक: ०६ मार्च,२०२६.

<u>वाचा</u> -

१. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६ /आरोग्य-०६, दिनांक १४ सप्टेंबर,२०१८

२. दिव्यांग कल्याण विभागाचे अर्ध-शासकीय पत्र क्र. सकीर्ण-२०२६/प्र.क्र.१/कार्यासन-३, दिनांक १२ फेब्रुवारी,२०२६

<u>प्रस्तावना</u> -

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६ /आरोग्य-०६, दिनांक १४ सप्टेंबर,२०१८अन्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६ (The Rights of Persons with Disability Act,२०१६) नुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी मिळविणाऱ्या काही अधिकारी/कर्मचारी यांचे बाबत दिव्यांग कल्याण विभागास तक्रारी प्राप्त होत असून सदर तक्रारींच्या अनुषंगाने दिव्यांग कल्याण विभागाने दि.०९.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे दिव्यांगत्व व दिव्यांगत्व प्रमाणपत्राची पुर्नपडताळणी करणेबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. नियुक्ती प्राधिकारी आणि उच्च शिक्षण संस्थांमार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र पडताळणी करणेबाबत दिलेल्या संदर्भावर अपिलीय मंडळे यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे, त्यासाठी उक्त शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन भरपत्र</u>-

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६ /आरोग्य-०६, दिनांक १४ सप्टेंबर,२०१८ मधील परिच्छेद क्रमांक ०३ मधील “ग” “तक्रार, अपील व निर्देश मंडळ” यामध्ये अनुक्रमांक ०३ नंतर अनुक्रमांक ०४ खालीलप्रमाणे वाचण्यात यावा:-

४. “संबंधित नियुक्ती प्राधिकारी किंवा उच्च शिक्षण संस्था यांनी दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्राची पुर्नतपासणी/पुर्नपडताळणी करीता संदर्भित केल्यास ज्या संस्थेनी ते दिव्यांग प्रमाणपत्र निर्गमित केले असेल त्या संस्थेच्या अपिलीय मंडळांनी त्या

प्रमाणपत्राची पुर्नतपासणी / पुर्नपडताळणी करणे बंधनकारक राहील. ज्याचे प्रमाणपत्र अपीलीय मंडळामार्फत दिले असेल तर त्या प्रमाणपत्राचे पुर्नपडताळणी/पुनर्विलोकन संबंधित नियुक्ती प्राधिकारी किंवा उच्च शिक्षण संस्था यांनी संबंधित अपीलीय मंडळ सोडून इतर कोणत्याही अपीलीय मंडळाकडून करून घेवू शकतील.

तसेच पुर्नतपासणी/पुर्नपडताळणी अंती अपिलीय मंडळ यांनी ते वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID) सुधारीत करणे, फेटाळणे इत्यादी बाबी ही करणे बंधनकारक राहील."

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३०६१५१६११९०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS VINAYAK BEDRE

Digitally signed by VILAS VINAYAK BEDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=1B09BB284202C3244DE049564D9DD7EB87FE034C5B3A70CDBBEFF28922A8584A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C3080E755D385A58B5DB4A10C33B490DA9418FDE088082BED6AD3733D62C9A85, cn=VILAS VINAYAK BEDRE
Date: 2026.03.06 16:22:09 +05'30'

**(विलास बेद्रे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई

४) मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई

५) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई

६) मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

७) मा. मंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

८) मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

९) मा.राज्यमंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

१०) सर्व विधानमंडळ सदस्य, विधान भवन, मुंबई

११) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१२) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

१३) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-०१

१४) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-०१

१५) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

१६) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

१७ प्रबंधक, मा. उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई (पत्राद्वारे)

१८) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई (पत्राद्वारे)

१९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे)

२०) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

२१) विभागीय आयुक्त (सर्व)

२२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई

२३) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे

२४) आयुक्त, महानगरपालीका (सर्व)

२५) जिल्हाधिकारी (सर्व)

२६) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

२७ संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई

२८) जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)

२९) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

३०) जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)

३१) सहसंचालक / उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)

३२) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये (सर्व)

३३) अधिष्ठाता, वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय (सर्व संबंधित रुग्णालये)

३४) वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालये (सर्व)

३५)संस्थाप्रमुख, ऑल इंडीया इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल मेडिसिन ॲन्ड रिहॅबिलीटेशन हाजी अली, मुंबई

३६) संस्था प्रमुख, अलीयावर जंग नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पीच ॲन्ड हिअरींग डिसॲबिलिटिज (दिव्यांगजन), बांद्रा, मुंबई

३७) अधिष्ठाता, के. ई. एम. रूग्णालय, जी. एस. मेडिकल कॉलेज, मुंबई

३८)अधिष्ठाता, लो.टि. स्मृ.वै. महाविद्यालय सायन रूग्णालय, मुंबई

३९)अधिष्ठाता, बा.य.ल. नायर रुग्णालय, मुंबई

४०) अधिष्ठाता, कुपर रूग्णालय व मेडिकल कॉलेज, मुंबई

४५) वैद्यकीय अधिक्षक, राजेवाडी हॉस्पीटल, घाटकोपर, मुंबई

४२) वैद्यकीय अधिक्षक, यशवंतराव चव्हाण हॉस्पीटल, पिंपरी चिंचवड, पुणे

४३) वैद्यकीय अधिक्षक, डॉ. झाकिर हुसेन हॉस्पीटल, नाशिक

४४) संस्था प्रमुख, कुष्ठरोग, कोंढावा, पुणे

४५) सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

४६) भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश वसंतराव भगवान चौक, नरीमन पाईंट, मुंबई-२०

४७) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर मुंबई- २८

४८) इंडीयन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई- २५

४९) राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पाईंट मुंबई- २१

५०) बहुजन समाज पक्ष, डी-१ इन्सा हठमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१

५१) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४०० ००४

५२) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी,मुंबई-१३

५३) सर्व कार्यासने, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

५४) निवड नस्ती (आरोग्य-६)